सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ११६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १६ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## भारतात टेलिग्रामवर बंदी, नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा मोठा निर्णय

### २१ जून रोजी घेतली जाणार नीटची परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६नवी दिल्ली -** २१ जून २०२६ रोजी होणाऱ्या 'नीट' (छएएढ णत्रॠ) परीक्षेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने कडक पावले उचलली आहेत. परीक्षेच्या पारदर्शकतेबाबत कोणतंही प्रश्नचिन्ह निर्माण होऊ नये, यासाठी शिक्षण मंत्रालय आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीए यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर, विशेषतः टेलिग्रामसारख्या प्सवर करडी नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने २२ जूनपर्यंत टेलिग्रामवर बंदी घातली आहे. कुठलाही गैरप्रकार, पेपरफुटी हे घडू नये यासाठी केंद्र सरकारने ही खबरदारी घेतली आहे. याआधी ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेचा पेपर हा टेलिग्रामवर ४८ तास आधी फुटला होता.

परीक्षेतील गैरप्रकारांवर मोठी कारवाई करत, केंद्र सरकारने देशभरात टेलिग्राम या मेसेजिंग पवर अधिकृतपणे बंदी घातली आहे. आगामी नीट (यूजी) २०२६ पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर पेपरफुटी आणि फसवणुकीचे रॅकेट रोखण्यासाठी राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या छढ- थेट शिफारशींनुसार ही तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. एनटीएने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने या प्लॅटफॉर्मवर कठोर, कालबद्ध निर्बंध लागू करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या




कलम ६९अ अंतर्गत आपत्कालीन अधिकारांचा वापर केला आहे.भारतातील टेलिग्राम प्लॅटफॉर्मवरील सार्वजनिक प्रवेश २२ जून २०२६ रोजी संपणाऱ्या एका निश्चित कालावधीसाठी पूर्णपणे प्रतिबंधित करण्यात आला आहे. यामध्ये नीट (यूजी) पुनर्परीक्षेच्या आधीचे, परीक्षेदरम्यानचे आणि परीक्षेनंतरचे महत्त्वाचे दिवस थेट समाविष्ट आहेत. त्याचबरोबर टेलिग्रामला भारतातील पूर्वी पोस्ट केलेल्या सर्व मेसेजसाठी एडिटिंग सुविधा ३० जून २०२६ पर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले आहे की, अनेक प्रकरणांमध्ये टेलिग्रामच्या 'मेसेज एडिट' या सुविधेचा अत्यंत पद्धतशीर आणि चुकीच्या मार्गाने वापर करण्यात आला. सायबर गुन्हेगार आणि पेपर लीक करणाऱ्या टोळ्या परीक्षा संपल्यानंतर जुन्याच मेसेजमध्ये फेरबदल (एवळीं) करत असत. परीक्षा संपल्यावर मूळ प्रश्नपत्रिका हाती येताच, ती जुन्या वेळेच्या मेसेजमध्ये समाविष्ट केली जायची. यामुळे सामान्य लोकांना आणि विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वीच पेपर लीक झाला होता, असा संभ्रम निर्माण होत असे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून रचला जाणारा हा खोटा बनाव रोखण्यासाठी आणि अफवांवर नियंत्रण मिळवण्यासाठीच सरकारने थेट टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्याचा कठोर निर्णय घेतला आहे.

## नागपुरात शरद पवार गटाचे ६ नगरसेवक 'नॉट रिचेबल'

### भाजपच्या संपर्कात असल्याची जोरदार चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६नागपूर**

नागपूर विधान परिषद निवडणुकीच्या तोंडावर महाविकास आघाडीच्या गोटात मोठी खळबळ उडवणारी माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे हिंगणा नगरपंचायतीतील तब्बल सहा नगरसेवक अचानक 'नॉट रिचेबल' झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. विशेष म्हणजे, हे नगरसेवक भाजपच्या संपर्कात असल्याची आणि त्यांनी सत्ताधारी पक्षाकडे झुकते माप दिल्याची कुजबूज सुरू झाल्याने नागपूर विधान परिषद निवडणुकीतील गणिते बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या या वृत्ताला कोणतीही अधिकृत पुष्टी मिळालेली



नसली, तरी निवडणुकीच्या अगदी तोंडावर घडलेल्या या घडामोडीमुळे महाविकास आघाडीच्या नेत्यांची धावपळ वाढल्याचे बोलले जात आहे.नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची विधान परिषद निवडणूक यंदा अत्यंत चुरशीची मानली जात आहे. महाविकास आघाडीने काँग्रेसचे नेते अतुल लोंढे यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. तर भाजपने राजीव पोतदार यांच्यावर विश्वास टाकला आहे.

नागपूर हा भाजपचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जात असला, तरी महाविकास आघाडीनेही सर्व घटक पक्षांना एकत्र आणत ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. त्यामुळे प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार आहे. नागपूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)कडे एकूण १९ मतदार असल्याचे सांगितले जाते. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत हे संख्याबळ महाविकास आघाडीसाठी निर्णायक मानले जात आहे.

मात्र, त्यापैकी हिंगणा नगरपंचायतीतील ६ नगरसेवक अचानक संपर्काबाहेर गेल्याची माहिती समोर आल्याने आघाडीच्या गोटात चिंता वाढली आहे. निवडणुकीच्या काही दिवस आधीच ही घटना घडल्याने राजकीय संशय अधिक गडद झाला आहे.

राजकीय वर्तुळात सध्या सर्वाधिक चर्चा या नगरसेवकांच्या संभाव्य राजकीय भूमिकेची सुरू आहे. हे सहा नगरसेवक भाजपच्या संपर्कात असल्याची आणि निवडणुकीत वेगळी भूमिका घेऊ शकतात, अशी चर्चा रंगली आहे. जर या चर्चांमध्ये तथ्य असेल आणि मतदानाच्या वेळी मतांमध्ये फूट पडली, तर त्याचा थेट परिणाम महाविकास आघाडीचे उमेदवार अतुल लोंढे यांच्या विजयाच्या शक्यतांवर होऊ शकतो. दुसरीकडे, भाजपचे उमेदवार राजीव पोतदार यांना याचा फायदा होण्याची शक्यता राजकीय विश्लेषकांकडून व्यक्त केली जात आहे.

## पैशांचा जोरावर राजकारण; लोकशाही धोक्यात

### माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख

**दि.१६अमरावती:** विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकीला अवघे ४८ तास शिल्लक असताना काँग्रेसमधील उमेदवारीचा तिढा अजूनही कायमच आहे. आज मंगळवारी रात्री जिल्ह्यातील नगरपालिकांच्या काँग्रेस गटनेत्यांची बैठक बोलावून वास्तव परिस्थिती जाणून घेतल्यानंतर काँग्रेस पक्ष पुढील निर्णय घेईल, असे माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी सांगितले. दरम्यान, डॉ. देशमुख यांनी भाजपवर गंभीर



**उघडपणे सत्तेचा दुरूपयोग**

डॉ. सुनील देशमुख म्हणाले, काँग्रेसने देखील यापुर्वी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुका लढवल्या आहेत, पण इतक्या उघडपणे सत्तेचा दुरूपयोग आणि पैशांचे वाटप यापुर्वी कधीही पाहिले नव्हते. लोकशाही व्यवस्थेलाच धक्का पोहचविण्याचा हा प्रकार आहे. महाराष्ट्रात चुकीच्या पद्धतीच्या राजकारणाची पायाभरणी केली जात आहे, असा आरोप डॉ. देशमुख यांनी केला. भाजपने विरोधी पक्षांच्या उमेदवारांना 'मॅनेज' करण्याचा प्रयत्न केला. अमरावतीसह इतर ठिकाणीही हेच प्रकार घडले. यातून भाजपला काय साध्य करायचे आहे, हा प्रश्न आहे, असे डॉ. देशमुख म्हणाले.

**■ काँग्रेस तटस्थ राहण्याची शक्यता**

या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अद्यापही भूमिका जाहीर केली नाही, तरी काँग्रेसच्या गटनेत्यांशी आणि जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर निर्णय घेतला जाईल, असे सांगण्यात आले आहे. काँग्रेसचे उमेदवार संपर्काबाहेर असल्याने वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांना काँग्रेसकडून पाठिंबा दिला जाऊ शकलो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होती, पण काँग्रेसच्या काही अटी वंचित बहुजन आघाडीला मान्य नसल्याचे सांगितले जात आहे, त्यामुळे काँग्रेस पक्ष या निवडणुकीत तटस्थ राहण्याचा निर्णय घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आज दुपारी झालेल्या बैठकीला खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, डॉ. सुनील देशमुख आदी उपस्थित होते.

**डिजीटल प्रचार करता येत नाही**

विधान परिषदेची ही निवडणूक अत्यंत गांभिर्यपूर्वक लढवायची असते. ही निवडणूक केवळ डिजीटल पद्धतीने प्रचार करून लढवता येत नाही. उमेदवारी स्वीकारल्यानंतर त्यासाठी आवश्यक तयारी असणे गरजेचे होते. काँग्रेस पक्षाने हर्षजीत देशमुख यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना उमेदवारी दिली होती. त्यामुळे निवडणुकीच्या निर्णायक टप्प्यावर उमेदवार अनुपस्थित राहणे, ही गंभीर बाब असल्याचे डॉ. सुनील देशमुख यांनी स्पष्ट केले. काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख हे प्रचाराच्या मुख्य टप्प्यात रुग्णालयात दाखल झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्थानिक काँग्रेस नेत्यांनी टीका केली आहे.

## 'मातोश्री'च्या बैठकीला ५ खासदार गैरहजर

### एक दिल्लीत शिंदेंच्या मंत्र्यांच्या घरी जाऊन आले...





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६मुंबई**

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीचे संकेत मिळत आहेत. तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत बंडखोरीची चर्चा ताजी असतानाच, आता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षात मोठ्या फुटीचा धोका निर्माण झाला आहे. उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री' या त्यांच्या निवासस्थानी बोलावलेल्या अत्यंत महत्त्वाच्या बैठकीला पक्षाच्या ९ पैकी चक्क ५ लोकसभा खासदारांनी दांडी मारल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या घडामोडींमुळे आता शिवसेना (यूबीटी) मध्ये 'ऑपरेशन टायगर' सुरू झाल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

शिवसेना (यूबीटी) कडे सध्या लोकसभेत एकूण ९ खासदार आहेत. रविवारी आगामी राजकीय रणनीतीसाठी उद्धव ठाकरेंनी सर्व खासदारांची बैठक बोलावली होती. मात्र, या बैठकीला केवळ ४ खासदार उपस्थित राहिले, तर ५ खासदारांनी या बैठकीकडे पाठ फिरवली. ऐन निवडणुकीच्या तोंडावर खासदारांचे हे वर्तन उद्धव ठाकरेंसाठी अत्यंत मोठा धक्का मानला जात आहे.

**बैठकीला गैरहजर राहिलेले ५ खासदार:**

**१. संजय जाधव**

**२. संजय देशमुख**

**३. ओमराजे निंबाळकर**

**४. भाऊसाहेब वाकचौरे**

**५. नागेश पाटील आष्टीकर**

**थेट शिंदे गटाच्या मंत्र्यांसोबत भेट!**

या अनुपस्थितीवर सारवासारव करत ठाकरे गटाने तात्काळ दावा केला की, हे सर्व खासदार 'व्हर्च्युअली' (ऑनलाइन) या बैठकीत सहभागी झाले होते. मात्र, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उद्धव ठाकरे हे या बैठकीत केवळ नागेश पाटील आष्टीकर यांच्याशीच थेट संपर्क साधू शकले. या चर्चांना तेव्हा अधिक बळ मिळाले, जेव्हा बैठकीला गैरहजर राहिलेले खासदार संजय देशमुख यांनी दिल्लीत थेट एकनाथ शिंदे गटाचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेतली. या भेटीनंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

## बचत गटांना मिळणार १ हेक्टर जमीन, सोबत १ लाखांचे अनुदान; बावनकुळेंनी सांगितली नवी योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६नागपूर-** राज्यातील महिला बचत गटांसाठी राज्य सरकारने मोठी आणि महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. महसूल विभागाच्या पडीत जमिनींचा उपयोग करून महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक पात्र महिला बचत गटाला एक हेक्टर (सुमारे अडीच एकर) जमीन पाच वर्षांच्या लीजवर देण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक गटाला एक लाख रुपयांचे अनुदानही दिले जाणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासोबतच पडीत सरकारी जमिनींचे संरक्षण आणि उत्पादनक्षम वापर हा या योजनेमागील प्रमुख उद्देश असल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

**प्रत्येक बचत गटाला मिळणार जमीन आणि आर्थिक मदत**

या नव्या धोरणानुसार महिला बचत गट किंवा महिला सहकारी संस्थांना महसूल विभागाच्या मालकीची एक हेक्टर जमीन पाच वर्षांसाठी वापरण्यास दिली जाणार आहे. या जमिनीवर चारा लागवड, बांबू लागवड, नेपियर गवताची शेती किंवा ग्रासलँड डेव्हलपमेंटसारखे प्रकल्प राबवता येणार आहेत.

यासाठी प्रत्येक गटाला एक लाख रुपयांचे अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. हा निधी जिल्हा नियोजन समिती (ऊझउ) किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठान (ऊचत्रऋ) निधीतून उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

**वर्षाला ४ ते ५ लाख रुपयांच्या उत्पन्नाचा दावा**

या योजनेतून महिला बचत गटांना मोठे आर्थिक उत्पन्न मिळू शकते, असा दावा सरकारने केला आहे. बावनकुळे यांच्या मते, एका बचत गटाला अडीच एकर जमीन दिल्यानंतर त्यावर चारा किंवा बांबू लागवड केल्यास वर्षाला सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळू शकते. विशेष म्हणजे या उत्पन्नावर सरकारचा कोणताही दावा राहणार नाही. जमिनीवरून मिळणारा संपूर्ण नफा आणि उत्पन्न संबंधित महिला



बचत गटालाच मिळणार असल्याने ग्रामीण भागातील महिलांसाठी ही मोठी आर्थिक संधी ठरू शकते.

राज्यात जवळपास प्रत्येक गावात एक किंवा अधिक महिला बचत गट कार्यरत आहेत. त्यामुळे या योजनेचा लाभ मोठ्या प्रमाणावर महिलांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. सरकारकडे उपलब्ध असलेल्या पडीत जमिनींच्या प्रमाणानुसार हजारो बचत गटांना या योजनेचा फायदा मिळू शकतो. त्यामुळे ग्रामीण भागात महिलांसाठी रोजगार निर्मितीचा हा मोठा प्रकल्प ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## प्रचाराची आज सांगता; विधान परिषदेसाठी मतदारांवर लक्ष केंद्रित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६मुंबई -** स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी गुरुवारी (दि. १८) मतदान होणार असल्यामुळे मंगळवारी सायंकाळी प्रचाराची रणधुमाळी थांबणार आहे. महायुतीचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील

महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षजीत देशमुख व वंचित चे उमेदवार डॉ. निलेश विश्वकर्मा यांच्यात लढत होत







असून, मतदानापूर्वी मतदारांच्या भेटीगाठी घेण्याचा वेग उमेदवारांकडून वाढविण्यात आला आहे.यात महाविकास आघाडीचे उमेदवार हर्षजीत देशमुख हे डिझिटल प्रचार करत आहे दोन उमेदवार मात्र मतदारांच्या प्रत्येक्षात भेटी गाठी घेत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य हेच या निवडणुकीचे मतदार असल्याने प्रत्येक मताला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे उमेदवारांसह दोन्ही आघाड्यांचे प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मतदारांशी संपर्क साधण्यासाठी प्रयत्नशील आहेत. प्रचाराचा कालावधी संपण्यापूर्वी जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याची चढाओढ सुरू असली तरी भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील या निवडणुकीमध्ये अगदी सहज विजयी होतील यात कुठलीही शंका नाही असे चित्र सध्या जिल्ह्यात पहावयास मिळत आहे.

## संपादकीय ......

# जलसंकटाच्या उंबरठ्यावर

*जूनच्या मध्यावर पोहोचूनही मान्सूनच्या पावसाचे आगमन न झाल्यामुळे अन्नदात्या शेतकऱ्यासह सर्वदूर भयाण चिंतेचे वातावरण आहे. तीव्र उन्हाच्या झळांसोबत संपूर्ण महाराष्ट्र सध्या तीव्र जलसंकटाचा सामना करत आहे. पुण्यामध्ये कालपासून एक दिवसआड पाणीपुरवठ्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली. पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीतील एकूण पाणीसाठा केवळ ५ टीएमसीवर आला आहे. टेमघर धरण तर पूर्ण कोरडे पडले असून पानशेत आणि वरसगाव या धरणांमधील पाणी तळ गाठत आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात प्रमुख तलावांमधील पाणीसाठा एकूण क्षमतेच्या केवळ १९.२२ टक्क्यांवर आला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने १५ मेपासूनच मुंबईत १० टक्के पाणी कपात लागू केली आहे. राज्यात अन्यत्रही पाणीटंचाईचे संकट गंभीर पातळीवर आहे. राज्यातील धरणांमध्ये सध्या केवळ ३५७.५ टीएमसी म्हणजेच फक्त २५ टक्के उपयुक्त जलसाठा असून, ही पातळी गेल्यावर्षीच्या तुलनेत चिंताजनकरीत्या कमी आहे. प्रशांत महासागरामध्ये 'अल निनो' सक्रिय झाला असून हा प्रवाह जागतिक हवामान इतिहासातील सर्वात तीव्र आणि शक्तिशाली रूप धारण करू शकतो, असा इशारा अमेरिकेच्या सरकारी हवामान संस्थांनी दिला आहे. अमेरिकेच्या 'नॅशनल ओशनिक अँड टमॉस्फेरिक डमिनिस्ट्रेशन'अंतर्गत कार्यरत 'क्लायमेट प्रेडिक्शन सेंटर'च्या (सीपीसी) ताज्या अहवालानुसार, नोव्हेंबर ते जानेवारी या कालावधीत 'अल निनो' अत्यंत तीव्र होण्याची शक्यता ६३ टक्के आहे. हा अंदाज खरा ठरला, तर १९५० पासून हा सर्वात मोठा आणि व्यापक 'अल निनो' प्रवाह ठरेल. याला 'सुपर अल निनो' म्हटले जाते. 'सीपीसी'ने १४ मे रोजी प्रसिद्ध केलेल्या आधीच्या बुलेटिनमध्ये हा 'अल निनो' तीव्र होण्याची शक्यता ३७ टक्के वर्तवली होती. मात्र, एका महिन्यात महासागराच्या पृष्ठभागावरील तापमानात झालेल्या वेगवान बदलांमुळे ही शक्यता आता ६३ टक्क्यांवर पोहोचली आहे. गेल्या २० वर्षांतील मान्सूनच्या नोंदींवर नजर टाकली, तर जून महिन्यातील पावसाचा आलेख अत्यंत लहरी आणि चिंताजनक दिसतो. जून महिन्याची दीर्घकालीन सरासरी १६५.३ मि.मी. इतकी निश्चित केली आहे. मात्र, गेल्या दोन दशकांत केवळ ६ वेळा जून महिन्यात समाधानकारक पाऊस झाला, तर उर्वरित १४ वर्षे या महिन्याने राज्याला कोरडेच ठेवले.*

*'अल निनो' तीव्र होतो तेव्हा महाराष्ट्रात बिकट पाणीसंकट अनुभवास येते. २०१४ मधील तीव्र 'अल निनो'च्या काळात देशात तब्बल ४२ टक्के पावसाची तूट होती आणि जूनमध्ये केवळ ९२ मि.मी. पाऊस पडला होता. २००९ मध्ये ३७ टक्के आणि २०१९ मध्ये ३३ टक्के पावसाची मोठी तूट जूनमध्ये होती. गतवर्षीचा जून महिना सामान्य सरासरीपेक्षा ९ टक्के अधिक म्हणजेच १८० मि.मी. पावसाचा राहिल्यामुळे दिलासा मिळाला असला, तरी यंदा 'सुपर अल निनो'चा धोका हा गेल्या दोन दशकांतील सर्वात भीषण ठरण्याची भीती आहे. याचा प्रभाव जगातील प्रत्येक भागावर सारखाच होईल, असे नाही. परंतु, हा प्रवाह जितका जास्त तीव्र असेल, तितकी हवामानात मान्सूनविरोधी नकारात्मक बदल घडवून आणण्याची त्याची क्षमता वाढते. यामुळे चालू मान्सून हंगामात भारतात पावसाची मोठी तूट निर्माण होण्याचा आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याचा धोका कमालीचा वाढला आहे. महाराष्ट्रातील जवळपास ७० ते ७५ टक्के शेती पावसावर अवलंबून आहे. 'अल निनो'चा थेट परिणाम खरीप हंगामावर होतो. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद या पिकांचे चक्र कोलमडते. भात शेतीचा काही भाग सिंचनाखाली असला, तरी धरणांमधील पाणी आटल्यास हे पीक संकटात येते. उसाला पाणी न मिळाल्यास होणारी हानी मोठी असते. ज्वारी आणि बाजरी कमी पाण्यात येतात; मात्र पावसाचा खंड महिनाभरापेक्षा जास्त वाढल्यास ही पिकेही करपून जातात. पशुधन आणि दुग्धोत्पादनावरही अत्यंत प्रतिकूल परिणाम होतो. पावसाने हुलकावणी दिल्यास शेतकरी पिके वाचवण्यासाठी कर्ज काढून बोअरवेल अधिक खोल खोदतात. मात्र, पर्जन्य तूट मोठी राहिल्यास भूजलाचा आधारही कोलमडतो. राज्य सरकारांकडे जिल्हा पातळीवर दुष्काळ निवारण आणि आकस्मिक पीक नियोजनाचे आराखडे आधीपासूनच आहेत; परंतु ते किमान १० वर्षे जुने आहेत.*

*यंदाची 'सुपर अल निनो'ची परिस्थिती अभूतपूर्व असल्याने, केंद्र सरकारने देशभरातील २०० जिल्ह्यांचे आपत्कालीन आराखडे तातडीने आणि परिस्थितीनुसार सुधारण्याचे आदेश दिलेत. यामध्ये पावसात पडणाऱ्या खंडाचा अभ्यास करून टप्प्याटप्प्याने कोणती पिके घ्यावीत आणि सिंचनाचे व्यवस्थापन कसे करावे, याचे सूक्ष्म नियोजन केले जात आहे. हवामान विभागाच्या दीर्घकालीन अंदाजानुसार, यंदा पावसाची सर्वाधिक तूट मराठवाडा ते उत्तर कर्नाटक या सलग भौगोलिक पट्ट्यामध्ये दिसण्याची शक्यता आहे. याशिवाय राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि पूर्व उत्तर प्रदेश येथील अनेक जिल्हे २०० संवेदनशील जिल्ह्यांमध्ये आहेत. 'अल निनो'च्या या संकटाळात 'इंडियन ओशन डायपोल'ची स्थिती संकटमोचक म्हणून मदतीला धावून येऊ शकते. १९९७ मधील भीषण 'सुपर अल निनो'चा प्रभाव याच पॉझिटिव्ह 'आयओडी'ने नष्ट केला होता आणि भारताला दुष्काळापासून वाचवले होते. सध्या 'आयओडी' न्यूट्रल आहे. मान्सूनच्या उत्तरार्धात तो पॉझिटिव्ह होऊ शकतो.*

*सॅटेलाईट, हवामान मॉडेल्स आणि भूजल नकाशे एकाच रिअल-टाईम अर्ली वॉर्निंग सिस्टीममध्ये जोडणे आवश्यक आहे, जेणेकरून विहिरी कोरड्या पडण्यापूर्वीच प्रशासनाला माहिती मिळेल. मुख्य मुद्दा आहे पाण्याचा. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यानंतर आपण अन्य देशांतून तेल आयात केले; पण पाण्याचे काय? पुणे, मुंबई, ठाणे येथील महाकाय लोकसंख्येला पाणीपुरवठा करणार कसा, हा यक्षप्रश्न आहे. पावसाचा खंड असाच वाढत गेला, तर या भागात विस्थापनाचे संकट ओढावू शकते. पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यासाठी उद्योगांच्या पाणीपुरवठ्यावर निर्बंध आणावे लागतील. त्याचा अतिरिक्त फटका अर्थव्यवस्थेला बसेल. महाराष्ट्राने आजवर अनेक दुष्काळांचा सामना केला; पण यावेळचे संकट ऐतिहासिक दिसत आहे. आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करायला हवा. दुष्काळात पाणी पुनर्वापराच्या तंत्रज्ञानाचा मोठा फायदा होतो. जागतिकस्तरावर सिंगापूर, मलेशिया, दुबई, इस्रायल या देशांनी वॉटर रिसायकलिंगबाबत आदर्श मॉडेल उभी केली आहेत; भारत त्यापासून बराच दूर आहे. 'अल निनो'च्या काळात होणारे आर्थिक नुकसान विचारात घेता पाणी पुनर्वापरावर केलेला खर्च निश्चितच कमी असेल. शासनाने याचा प्राधान्याने विचार करायला हवा.*

# जिल्हाधिकारी आशिष येरेकर गुरुकुंज आश्रम पाहून मंत्रमुग्ध

## राष्ट्रसंतांच्या महासमाधीचे दर्शन घेत सामुदायिक प्रार्थनेत सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६गुरुकुंज मोझरी**

अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नुकतीच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज आश्रमाला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी राष्ट्रसंतांच्या महासमाधीचे दर्शन घेतले आणि सामुदायिक प्रार्थनेत सहभाग घेतला. आश्रम परिसर आणि आध्यात्मिक वातावरण पाहून ते मंत्रमुग्ध झाले.

जिल्हाधिकारी येरेकर यांचा मोझरी ग्राम येथे 'गावमुक्काम' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या नियोजित दौऱ्यानिमित्त त्यांनी सायंकाळी गुरुकुंज आश्रमास भेट दिली.

सर्वप्रथम, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी राष्ट्रसंतांच्या महासमाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर ते सामुदायिक प्रार्थनेला उपस्थित राहिले. आश्रमातील आध्यात्मिक वातावरण आणि परिसराची माहिती जाणून घेतल्यानंतर ते अक्षरशः भारावून गेले.



या भेटीदरम्यान, त्यांनी अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयालाही भेट दिली. तेथे त्यांनी पद्मश्री पुरस्कारप्राप्त जनार्दनपंत बोथे गुरुजी यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जिल्हाधिकारी येरेकर यांच्यासह उपस्थित उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे आणि तहसीलदार मयुर कळसे यांनी बोथे गुरुजींचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. बोथे गुरुजींनी जिल्हाधिकाऱ्यांना राष्ट्रसंतांच्या सहवासातील महत्त्वाचे प्रसंग, महाराजांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान आणि त्यांच्या विविध कार्यांची माहिती दिली.या अनुभवानंतर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले, आश्रम परिसर पाहून आणि सामुदायिक प्रार्थनेतील आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेऊन मी मंत्रमुग्ध झालो आहे. अशी मन:शांती आणखी कोठे मिळणे अशक्य आहे.

# अमरावतीच्या कुमकुम मोहोडचा जागतिक धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णवेध

## मिक्स्ड टीम प्रकारात भारताला ऐतिहासिक सुवर्णपदक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**

तुर्की येथील अंतालिया येथे ९ ते १४ जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या 'आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-३' (धनुर्विद्या विश्वचषक) स्पर्धेत भारतीय संघाने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. अमरावतीच्या खेलो इंडिया केंद्राची प्रशिक्षणार्थी कुमकुम मोहोड हिने भारतीय संघातील धीरज बोम्मादेवरा राय याच्यासह मिक्स्ड टीम (मिश्र संघ) प्रकारात अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा ५-१ अशा सेट फरकाने पराभव करून भारताला हे ऐतिहासिक सुवर्णपदक मिळवून दिले आहे.अमरावती येथील खेलो इंडिया धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्रात मागील आठ वर्षांपासून राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रफुल्ल डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित सराव करणाऱ्या कुमकुमच्या या सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय यशामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशाचा गौरव वाढला आहे. तसेच यापूर्वीही चीन येथे झालेल्या आर्चरी वर्ल्ड कप स्टेज-२ स्पर्धेत तिने भारतीय महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना सुवर्णपदक जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. कुमकुमच्या या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तिचे विशेष अभिनंदन केले आहे. उपसंचालक तथा जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे सचिव प्रमोद चांदुरकर आणि अध्यक्ष अ‍ॅड. श्री. प्रशांत देशपांडे यांनीही शुभेच्छा दिल्या आहेत. कुमकुमची सध्याची प्रगती आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सातत्य पाहता ती आगामी स्पर्धांमध्येही भारताला आणखी पदके मिळवून देईल, असा विश्वास तिचे प्रशिक्षक प्रफुल डांगे यांनी व्यक्त केला असून कुमकुम आता जुलै २०२६ मध्ये स्पेन येथे होणाऱ्या 'वर्ल्ड कप स्टेज-४' आणि जपान येथे होणाऱ्या '२० व्या आशियाई क्रीडा' स्पर्धेत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.




# लाडकी बहीण योजनेत ६०७ पुरुषांनी महिला बनून लाटला लाभ

## जिल्ह्यात धक्कादायक प्रकार उघड, आता होणार रकमेची वसुली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत अमरावती जिल्ह्यात धक्कादायक गैरप्रकार उघडकीस आला आहे. तब्बल ६०७ पुरुषांनी महिला असल्याचे भासवून अथवा महिलांच्या नावाने अर्ज सादर करून शासनाच्या योजनेचा लाभ घेतल्याचे पडताळणीत समोर आले आहे. या प्रकरामुळे प्रशासनात खळबळ उडाली असून, महिला व बाल विकास विभागाने संबंधितांकडून मिळालेली संपूर्ण रक्कम वसूल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी एकूण ७ लाख २० हजार ३६५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी छाननीनंतर ६ लाख ९५ हजार ३५० महिला लाभार्थी पात्र ठरल्या आहेत. मात्र, सखोल पडताळणीत ३३ हजार ३०४ अर्जदार अपात्र आढळून आल्याने त्यांना योजनेतून बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला असून, जून महिन्यापासून त्यांचे अनुदान बंद करण्यात आले आहे.महिला आणि बाल विकास विभागाच्या तपासात सर्वाधिक धक्कादायक बाब समोर आली ती म्हणजे ६०७ पुरुषांनी महिला असल्याचे भासवून योजनेचा लाभ घेतला आहे. काहींनी महिलांच्या नावाचा वापर केला, तर काहींनी चुकीची माहिती देत शासनाची फसवणूक केल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. आता संबंधितांची ओळख निश्चित करून त्यांच्याकडून लाभाची संपूर्ण रक्कम वसूल केली जाणार आहे.


### हजारो लाभार्थी ठरले अपात्र

पात्रता पडताळणीदरम्यान विविध निकषांवर मोठ्या प्रमाणात लाभार्थी अपात्र आढळून आले. याशिवाय काही लाभार्थी निर्धारित वयोमयदिपेक्षा अधिक वयाचे असल्याचेही तपासात समोर आले आहे.

| | |
|---|---|
| पुरुष लाभार्थी | ६०७ |
| वयोमर्यादिपेक्षा कमी वयाचे अर्जदार | १,४७२ |
| अल्पवयीन लाभार्थी | १,७६२ |
| चारचाकी वाहनधारक | ४,४०५ |
| आयकरदाते | १५,१५४ |

# संत गुलाबराव महाराजांच्या जयंती उत्सवाचे नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ अमरावती** – संत गुलाबराव महाराज यांची जयंती सन २०२६ पासून शासनामार्फत राज्यभर शासकीय स्तरावर साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर श्रीक्षेत्र लोणी (टाकळी), ता. नांदगाव खंडेश्वर, या पवित्र स्थळाकडे महाराष्ट्राचे लक्ष वेधले गेले असून मुख्यमंत्री हे ६ जुलै रोजी येथे भेट देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




श्री संत गुलाबराव महाराज साहित्य प्रचार मोहिमेचे प्रमुखमाधुर्यठाकरे यांनी सांगितलेकी,नुकतीच मंत्रालय, मुंबई येथे मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेऊन श्री संत गुलाबराव महाराजांचे साहित्य, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांचे ग्रंथ सर्वसामान्यांना पर्यंत पोहचवण्याकरिताराबविण्यात येणारे विविध उपक्रम, तसेच राज्यस्तरीय जयंती उत्सवाच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. शासनाने श्री संत गुलाबराव महाराजांच्या जयंतीला शासकीय मान्यता दिल्यानंतर त्यांच्या विचारांचा प्रसार अधिक व्यापक स्तरावर करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येत असून, मुख्यमंत्री फडणवीस यांचा दौरा निश्चित झाल्यास संतप्रेमी, भाविक, अभ्यासक, संशोधक आणि विदर्भातील जनतेसाठी तो एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायी क्षण ठरणार आहे.

# जलकुंभाची पाइपलाइन फुटली, ६ हजार कुटुंब सापडले अडचणीत

## वल्लभनगर,आनंदनगर, गडगडेश्वरचा भाग पाण्याविना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–**

शहरातील दाट लोकवस्तीचा भाग असलेल्या पार्वती नगर परिसरातील जलकुंभातून घरोघरी पाणी पोहोचवणाऱ्या जलवाहिनीला गळती लागल्यामुळे आज, सोमवारचा पाणी पुरवठा खंडित झाला. या जलवाहिनीशी सुमारे ६ हजार कुटुंब म्हणजेच २५ हजार लोकवस्ती जोडली गेली आहे. या नागरिकांना पाणी केव्हा मिळणार, हे अनिश्चित आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या मते मंगळवारी मध्यरात्रीपर्यंत दुरुस्ती कार्य पूर्ण होऊ शकते. परंतु मध्येच आणखी काही बिघाड झाल्यास हा कालावधी अनिश्चित काळासाठी वाढूही शकतो.




दरम्यान ऐनवेळी उद्भवलेल्या या बिघाडामुळे परिसरातील पार्वतीनगर, वल्लभनगर, छाया कॉलनी, आनंदनगर, गडगडेश्वर आदी भागातील नागरिकांना आज पाण्याविना दिवस काढावा लागला. काहींनी संचित पाण्याचा वापर करुन दिवस घालवला, तर काहींनी पर्यायी व्यवस्थेच्या आधारे पाण्याची सोय करुन घेतली. दरम्यान मजीप्राच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी सकाळपासूनच दुरुस्ती कार्य सुरु केले आहे.

जलकुंभातून घरोघरी पाणी पोहोचवणाऱ्या जलवाहिनीला जमीनीच्या आत सुमारे दीड मीटर खोल भागात 'डक फूट बेन्ड' असते. या ठिकाणी वरुन खाली येणारा उभा पाइप जमीनीच्या आत असलेल्या आडव्या जलवाहिनीशी जोडलेला असतो. नेमक्या याच ठिकाणी गळती सुरु झाल्याने पाणी पुरवठा खंडित झाला आहे. अमरावती आणि बडनेरा शहराला अप्पर वर्धा धरणातून (मोर्शी) पाणी पुरवठा केला जातो. काही दिवसांपूर्वीच डवरगावजवळ ३० वर्षे जुनी मुख्य जलवाहिनी फुटल्यामुळे संपूर्ण शहराचा पुरवठा विस्कळीत झाला होता. त्या काळातसंपामुळे दुरुस्तीच्या कामाचा सर्वाधिक फटका पार्वतीनगर, साईनगर , गोपालनगर येथे बसला होता.

# कसबेगव्हाण येथे शिक्षकाच्या बदलीविरोधात पालकांचा ठिय्या

## पटसंख्या सातवरून ४२ पर्यंत वाढविणाऱ्या शिक्षकाची बदली

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अंजनगावसुर्जी,**

कसबेगव्हाण येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील एकमेव शिक्षकाची समायोजनाच्या नावाखाली बदली झाल्याने शाळा शिक्षकाविना झाली. याविरोधात संतप्त पालक व ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या शिक्षण विभागासमोर ठिय्या आंदोलन छेडले. अखेर प्रशासनाने दोन शिक्षकांना अतिरिक्त प्रभारावर शाळेत नियुक्त केल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. कसबेगव्हाण येथील इयत्ता ६ वी ते १० वीच्या शाळेत २०२५ मध्ये केवळ सात विद्यार्थी होते. मात्र, शिक्षक सुधाकर बालपांडे यांनी पालकांशी संपर्क साधून सरकारी शाळेचे महत्त्व पटवून दिल्याने २०२६ मध्ये पटसंख्या ४२ वर पोहोचली, असे असतानाही शिक्षण विभागाने जुन्या पटसंख्येच्या आधारे त्यांची धारणी येथे बदली केली. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. माजी सरपंच शशिकांत मंगळे यांच्या नेतृत्वात आंदोलनानंतर शिक्षण विभागाने दोन शिक्षकांची नियुक्ती केली. तसेच बालपांडे यांची पुन्हा कसबेगव्हाण येथे बदली करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठविल्याचे आंदोलकांना कळविण्यात आले. पालकांची मागणी लक्षात घेऊन शाळेला दोन शिक्षक देण्यात आले आहेत. समायोजनाचे निर्णय वरिष्ठ स्तरावरून घेतले जातात, अशी माहिती प्रभारी गटशिक्षणाधिकारी शीला आठवले यांनी दिली.



आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

## तुकाराम मुंढेच्या कारवाईचा धसका

# शहानूर नदीच्या काठावर फेकले एक्सपायर चिप्सचे पाकीट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६दर्यापूर-** खाद्य व औषधी प्रशासनचे (एफडीए) मुख्य सचिव तुकाराम मुंढे यांच्या कारवाईच्या हंटर भिती ग्रामीण भागात व्यक्त होत आहे. भेसळ आणि एक्सपायरी झालेल्या खाद्यपदार्थांची कसून चौकशी सुरू असल्याने आता ग्रामीण भागातील दुकानदारांनी धास्ती पकडली आहे.

येवदा परिसरातील छोटे मोठे दुकानांमध्ये अनेक ठिकाणी चिप्सची विक्री केली जाते. परंतु, घेणार्या ग्राहक एक्सपायरी न पाहता बिनधास्त खरेदी करतात यावर अन्न व प्रशासनाचे कुठलेही लक्ष नसल्याने ग्रामीण भागात हा प्रकार मोठ्या प्रमाणात होतो. कोणाचे भय नसल्याने मोठे व्यापारी एक्सपायरी झालेल्या मालाची सर्रास विक्री करायचे. परंतु, तुकाराम मुंढे यांनी कारवाईचा बडगा उगारल्याने सर्वच सर्तक झाले आहे. येवदा येथील अज्ञात दुकानदाराने भीतीपोटी एक्सपायरी झालेले चिप्स पाकीट येथील शहानुर नदीच्या पात्रामध्ये फेकून दिल्याचे निदर्शनास आले. ही बाब लोकांच्या लक्षात येताच लोकांनी तर्कवितर्क लावणे सुरु केले आहे.

अन्न व औषध प्रशासनाने ग्रामीण भागात होत असलेल्या अशा प्रकाराकडे लक्ष देण्याची गरज आहे. तसे अशा दुकानूनदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जनतेकडून होत आहे.

## राज्य आरोग्य विभागाच्या नोडल अधिकाऱ्यांकडून

# जिल्हा सामान्य रुग्णालय, डफरिन, सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलची पाहणी

## दयनीय अवस्था पाहून अधिकारी संतापले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**
जिल्ह्यातील सरकारी रुग्णालयांमधील अनागोंदी आणि निकृष्ट आरोग्य सेवांविरोधात राज्य आरोग्य विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, राज्य आरोग्य विभागाचे नोडल अधिकारी डॉ. स्वप्निल सांगळे हे सोमवारी (दि.१५) अमरावतीत दाखल झाले. यावेळी त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा महिला रुग्णालय (डफरिन) आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची पाहणी केली. पाहणीदरम्यान, डॉ. सांगळे हे रुग्णालयांची अवस्था बघून संतप्त झाले. रुग्णालयांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव आणि प्रशासकीय नियंत्रण पूर्णपणे कमकुवत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे मुंबईहून आलेल्या चमूने कर्मचाऱ्यांची कानउघडणी केली. येथील अधिकारी-अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांवर प्रभावी तपासणीत रुग्णालयाच्या आवारात घाण, शौचालयाची तुटपूट आणि स्वच्छतागृहांचे दरवाजे, अव्यवस्थित सुविधा आढळून आली. स्वच्छतागृहाचा एक दरवाजा गेल्या तीन वर्षांपासून तुटलेला असूनही त्याची दुरुस्ती झाली नसल्याने डॉ. सांगळे यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

रुग्णालय अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांवरनियंत्रण नाही, ज्यामुळे अगदी किरकोळ समस्याही वर्षानुवर्षे तशाच राहतात. डॉ. सांगळे यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकारने प्रत्येक सरकारी रुग्णालयाला देखभाल आणि दुरुस्तीसाठी पाच कोटी रुपयांचा निधी दिला आहे. त्यानंतरही अमरावतीमधील रुग्णालयांच्या पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था चिंताजनक आहे. पुरेसा निधी उपलब्ध असतानाही किरकोळ दुरुस्तीची कामेही वेळेवर का पूर्ण झाली नाहीत, असा प्रश्नत्यांनी विचारला. तपासणीदरम्यान, डॉ. सांगळे यांनी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. नंदकिशोर राऊत यांच्यासोबतबैठकही घेतली. त्यांनी सांगितले की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम लवकरात लवकरपूर्ण करणे अत्यावश्यक आहे. त्यांच्या मते, जोपर्यंत जिल्हा रुग्णालय आणि डफरिन रुग्णालय पूर्णपणे वैद्यकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरित होत नाहीत, तोपर्यंत नवीन डॉक्टरांना प्रशिक्षण देणे आणि नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा पुरवणे कठीण होईल.

### मुख्यमंत्री समवेत मुंबईत उच्चस्तरीय होणार बैठक

डॉ. सांगळे यांनी सांगितले की, अमरावती रुग्णालयांसमोरील समस्या आणि वैद्यकीय महाविद्यालयाशी संबंधित मुद्यांवर चर्चा करण्यासाठी ते लवकरच मुंबईत आरोग्य मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहेत. या बैठकीत, रुग्णालयांमधील गोंधळ दूर करण्यासाठी आणि आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी आवश्यक निर्णय घेण्याचा ते आग्रह धरतील असे ही ते म्हणालेत.-

# प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष; आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**
मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत राज्यभरातील प्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयांतील कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून बेमुदत संप पुकारला आहे. सेवा प्रवेश नियमांसह अनेक मागण्या दीर्घकाळ प्रलंबित असल्याने हे आंदोलन करण्यात येत असल्याचे संघटनेने सांगितले .यापूर्वी २ जून रोजी दोन तासांचे धरणे व निदर्शने, तर ९ जून रोजी एक दिवसीय लाक्षणिक संप करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, त्यानंतरही मागण्यांबाबत कोणतीही ठोस कार्यवाही किंवा सकारात्मक प्रतिसाद मिळाला नसल्याचा दावा संघटनेने केला आहे.त्यामुळे पूर्वनियोजित आंदोलनाच्या पुढील टप्प्यात राज्यातील सर्व आरटीओ कार्यालयांतील कर्मचाऱ्यांनी १६ जूनपासून बेमुदत संपात सहभाग घेतला. शासनाने तातडीने मागण्या मान्य न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर, राज्य संघटक संदीप खवले यांच्यासह अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल माठोडे, उज्वल ठाकरे, संजय चौधरी, देवानंद खंडारे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी ही माहिती दिली.

# २१ जूनला अमरावतीकर एकत्र येऊन साजरा करणार योगदिन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या वतीने रविवार, दि. २१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जाणार आहे. यंदाच्या योग दिनासाठी 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' ही थीम आणि 'योग करा निरोगी रहा आणि आनंदी आयुष्य जगा' हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे.

यावर्षीचा मुख्य जिल्हास्तरीय कार्यक्रम २१ जून रोजी सकाळी ६.१५ ते ७.१५ या वेळेत विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती येथे आयोजित करण्यात एकाला असून यात कार्यक्रमाला प्रमुख लोकप्रतिनिधी, वरिष्ठ सनंदी अधिकारी आणि ज्येष्ठ योग प्रसारक उपस्थित राहणार आहेत.हा कार्यक्रम जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, एस.आर.पी.एफ.,महानगरपालिका, शिक्षण विभाग, वनविभाग, जिल्हा होमगार्ड, राष्ट्रीय छात्र सेना, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, पतंजली योग समिती, आर्ट ऑफ लिव्हिंग आणि क्रीडा भारती यांसह जिल्ह्यातील विविध योग व क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे.जिल्ह्यातील सर्व नागरिक, क्रीडाप्रेमी, योग समिती सदस्य, क्रीडा प्रशिक्षक, शिक्षक व विद्यार्थ्यांना २१ जून रोजी सकाळी ६.१५ वाजता विभागीय क्रीडा संकुल येथे उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे. तसेच कार्यक्रमाला येताना नागरिकांनी सोबत स्वतःची पाण्याची बॉटल आणि चटई आणावी, अशी सूचना देण्यात आली आहे.

# कॉम्रेड्स मॅरेथॉनमध्ये डॉ. सागर धनोडकर यांची दमदार झेप

### दक्षिण आफ्रिकेतील स्पर्धा १० तास ४७ मिनिटांत पूर्ण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** जगातील सर्वाधिक आव्हानात्मक आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या कॉम्रेड्स मॅरेथॉन स्पर्धेत अमरावतीचे धावपटू डॉ. सागर धनोडकर यांनी यशस्वी सहभाग नोंदवत शहराचा लौकिक जागतिक स्तरावर उंचावला. त्यांनी ८९ किलोमीटरची ही स्पर्धा १० तास ४७ मिनिटांत पूर्ण केली. दक्षिण आफ्रिकेतील पिटरमारिट्झबर्ग ते डर्बन या मार्गावर आयोजित करण्यात आलेल्या या मॅरेथॉनमध्ये जगभरातील २२ हजारांहून अधिक धावपटूंनी सहभाग घेतला होता. भारतातून २७९ धावपटू या स्पर्धेत सहभागी झाले होते. अमरावतीचे प्रतिनिधित्व करणारे डॉ. सागर धनोडकर हे शहरातील एकमेव धावपटू होते. पहाटे पाच वाजता सुरू झालेली ही स्पर्धा डर्बन येथे सायंकाळी पूर्ण झाली. डॉ. धनोडकर यांनी निर्धारित वेळेपूर्वीच स्पर्धा पूर्ण करून आपली क्षमता सिद्ध केली. विशेष म्हणजे, त्यांनी सलग दुसऱ्या वर्षी कॉम्रेड्स मॅरेथॉन यशस्वीरीत्या पूर्ण केली असून सलग दोन वर्षे पदकही पटकाविले आहे. या स्पर्धेची तयारी त्यांनी जानेवारी महिन्यापासून सुरू केली होती. पाच महिन्यांच्या कठोर प्रशिक्षणानंतर त्यांनी हे यश संपादन केले. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी कुटुंबीय, मार्गदर्शक, सहकारी धावपटू आणि मित्रपरिवाराला दिले.

# शहानूर नदीपात्रात खोल चरांची आडवी नांगरट

## जलसंधारणासाठी खोडगाव व हंतोडा येथे अंमलबजावणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अंजनगावसुर्जी,**
जलसंधारणाला चालना देण्यासाठी खोडगाव व हंतोडा येथील शहानूर नदीच्या कोरड्या पात्रात खोल चरांची आडवी नांगरट करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. श्री श्री रविशंकर यांच्या प्रेरणा व सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे पावसाचे पाणी जमिनीत अधिक प्रमाणात मुरून भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. उपक्रमाच्या प्रारंभी श्री श्री रविशंकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर नदीपात्रात खोल चरांची आडवी नांगरट करण्याच्या कामाला सुरवात करण्यात आली. नदीपात्रात आडव्या चरांची निर्मिती केल्याने पावसाचे वाहून जाणारे पाणी अडविले जाऊन ते जमिनीत झिरपते. त्यामुळे भूजल साठ्यात वाढ होण्यास मदत होते.

गेल्या एक-दोन वर्षांपासून राबविण्यात आलेल्या अशाच प्रयोगांचे सकारात्मक परिणाम दिसून आले असल्याचे कार्ड संस्थेचे अध्यक्ष व कृषी शास्त्रज्ञ विजय लाडोळे यांनी सांगितले. एल निनोसारख्या हवामान बदलांच्या पार्श्वभूमीवर पीक उत्पादनावर होणारे विपरीत परिणाम कमी करण्यासाठी अशा जलसंधारणाच्या उपाययोजना प्रभावी ठरू शकतात, असेही त्यांनी नमूद केले. खोडगाव येथे झालेल्या कार्यक्रमाला सरपंच योगेश नेमाडे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष आवंडकर, विनोद येऊल, आकाश दाभाडे आदी उपस्थित होते. तर हंतोडा येथे सरपंच रवी गोळे, उपसरपंच सत्यविजय उंबरकर तसेच परिसरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सध्या पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत असताना नदीपात्रातील या आडव्या नांगरटीमुळे पडणारा पाऊस अधिक प्रमाणात जमिनीत मुरेल व भविष्यात विहिरी तसेच बोअरवेलच्या पाणीपातळीत वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

# कांडली ग्रामपंचायत सदस्यपदाचे आरक्षण जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६परतवाडा,** शहरालगद असलेल्या कांडली ग्रामपंचायत सदस्यपदांच्या आरक्षणाची सोडत १२ जूनला ग्रामपंचायत कार्यालय परिसरात आयोजित विशेष ग्रामसभेमध्ये काढण्यात आली. त्यामुळे इच्छूक निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. अध्यासी अधिकारी अमोल बोकडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष ग्रामसभेत ग्रामपंचायत कांडली प्रशासक सविता आहाके, ग्रामपंचायत अधिकारी विनोद मोरे यांच्यासह प्रशासकीय समिती सदस्य, अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोडतीनुसार ग्रामपंचायतच्या ११ सदस्यपदांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले. प्रभाग एक (अ) अनुसूचित जाती (महिला), (ब) नामाप्र, (क) सर्वसाधारण महिला प्रभाग दोन (अ) सर्वसाधारण (महिला), (ब) सर्वसाधारण तसेच प्रभाग तीन (अ) अनुसूचित जाती, (ब) सर्वसाधारण, (क) सर्वसाधारण (महिला), प्रभाग चार (अ) नामाप्र (महिला), (ब) सर्वसाधारण (महिला), (ड) सर्वसाधारण, तर प्रभाग पाच (अ) अनुसूचित जाती (महिला), (ब) नामाप्र (महिला), (क) सर्वसाधारण, प्रभाग सहा (अ) अनुसूचित जमाती (महिला), (ब) नामाप्र, (ड) सर्वसाधारण अशी आरक्षण सोडत निघाले आहे. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी विनोद मोरे, ग्राम महसूल अधिकारी प्रतीक्षा दामोदरे आदी अधिकारी, कर्मचारी व विविध पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. ग्रामपंचायत अधिकारी मोरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अमरावती विभागात पहिल्यांदाच होणार 'पीएलएफएस' आणि 'एएसयूएसई' सर्वेक्षण

# विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या हस्ते सर्वेक्षणांचा शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** केंद्र शासनाच्या सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन मंत्रालय यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच 'मित्रा' व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने अमरावती विभागात दोन अत्यंत महत्त्वाचे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयामार्फत राज्यात पहिल्यांदाच 'नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण' आणि 'असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण' एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत राबविले जाणार आहे. या राष्ट्रीय कार्यात विभागातील नागरिकांनी सर्वेक्षणासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची आखणी करण्यासाठी ही सर्वेक्षणे अत्यंत मोलाची ठरणार आहेत. या सर्वेक्षणांचे स्वरूप आणि उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत नियतकालिक श्रम शक्ती सर्वेक्षण अंतर्गत निवडक कुटुंबांकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे श्रम बाजाराचे महत्त्वाचे निर्देशांक तयार केले जातील. यामध्ये प्रामुख्याने श्रम शक्ती सहभाग दर कामगार-लोकसंख्या गुणोत्तर बेरोजगारी दर या घटकांची अचूक आकडेवारी संकलित केली जाईल, ज्यामुळे भविष्यातील रोजगार धोरणांना दिशा मिळेल.असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण अंतर्गत राज्यातील उत्पादन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रातील असंघटीत व बिगर-कृषि आस्थापनांच्या आर्थिक आणि कार्यात्मक वैशिष्ट्यांची आकडेवारी गोळा केली जाणार आहे. यामुळे असंघटीत क्षेत्रातील उद्योगांच्या विकासासाठी योजना आखणे सोपे होईल.सर्वेक्षणाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि नागरिकांसाठी महत्त्वाची माहिती पुढीलप्रमाणे आहे- या सर्वेक्षणांची माहिती गोळा करण्यासाठी अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयांतर्गत या नामांकित संस्थेची शासनाने निवड केली आहे. या संस्थेमार्फत नियुक्त केलेले अन्वेषक आणि पर्यवेक्षक केवळ 'नमुना पद्धतीने' निवडलेल्या ग्रामीण भागातील गावांना आणि शहरातील विशिष्ट वॉर्डांमधील कुटुंबांना व आस्थापनांना प्रत्यक्ष भेट देऊन विहित प्रपत्रात माहिती गोळा करणार आहेत.या सर्वेक्षणा अंतर्गत कुटुंब प्रमुख आणि उद्योग/आस्थापना प्रमुख यांच्या उपलब्धतेसाठी नियुक्त कर्मचारी रविवार व शासकीय सुट्टीच्या दिवशीही भेटी देऊ शकतात. सर्वेक्षणादरम्यान नागरिकांकडून किंवा उद्योगांकडून मिळालेली वैयक्तिक व व्यावसायिक माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. त्याचा वापर केवळ सांख्यिकी उद्देशांसाठी आणि शासकीय योजनांच्या नियोजनासाठीच केला

# चांदूर रेल्वे येथील 'टीएमओं 'ना कारणे दाखवा

## सीईओं च्या आकस्मिक भेटीत कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** आमला विश्वेश्वर येथे गुरुवार, ११ जून रोजी सीईओ सत्यम गांधी यांनी अचानक भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी सीईओंना प्राथमिक आरोग्य केंद्रात अस्वच्छता आमला येथील आढळून आल्याने सीईओंनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे येथील तालुका वैद्यकीय अधिकारी निकोसे भेटीत कारवाई यांना कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे. तर आमला विश्वेश्वर येथील वैद्यकीय अधिकारी संतोष सरकुंडे यांचे वेतन कपातीचे आदेश जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिले आहेत.चांदूर रेल्वे तालुक्यातील आमला विश्वेश्वर येथे अचानक भेट देऊन विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि अंगणवाडी केंद्रातील कामकाजाचा तपासणी व आढावा घेतला होता. यावेळी त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन परिसर स्वच्छ ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या. यावेळी नादुरुस्त सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले. उपस्थित कर्मचाऱ्यांची हजेरी पडताळून वैद्यकीय अधीक्षकांच्या अनुपस्थितीबाबत संबंधित खातेप्रमुखांकडे विचारणा करण्यात आली. केंद्रातील अभिलेख व कागदपत्रांची तपासणी करून अनावश्यक कागदपत्रांची विहित पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रातील अस्वच्छता व रुग्णांसाठी असलेल्या सोई-सुविधाचा अभाव आढळून आल्याने सीईओंनी या प्रकरणी चांदुर रेल्वेच्या तालुका वैद्यकीय अधिकारी यांना शो कॉज बजाविली आहेत. तर आमला विश्वेश्वरचे एमओ यांचे वेतन कपातीचे आदेश सीईओ सत्यम गांधी यांनी दिले आहेत.

# मतपेट्यांसाठी नियोजन भवनात स्ट्राँगरूम

## अहोरात्र सशस्त्र पहारा, दर दोन तासांनी तपासणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक संस्था मतदारसंघाची निवडणूक १८ जूनला होणार आहे. मतदानानंतर सात मतदानकेंद्रांतील मतपेट्या, नियोजन भवन येथील स्ट्राँगरूममध्ये ठेवल्या जाणार आहेत. १८ ते २२ जून या पाच दिवसांत या मतपेट्या कडेकोट सुरक्षेत ठेवण्याचे नियोजन करण्यात आले असून येथे पोलिसांचा २४ तास अहोरात्र सशस्त्र पहारा राहणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे १८ जून रोजी सायंकाळी चार वाजतापासून मतपेट्यांची सुरक्षा सुरू होणार आहे. स्ट्राँगरूमच्या आत आणि मुख्य




प्रवेशद्वारावर स्वतंत्र सशस्त्र पोलिस तैनात राहणार असून मतपेट्यांभोवती अभेद्य सुरक्षाकवच उभारण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे, १८ जून रोजी रात्री ८ वाजतापासून ते २२ जून रोजी सकाळी सहा वाजेपर्यंत दर दोन तासांनी पोलिस निरीक्षक अथवा सहायक पोलिस आयुक्त स्वत: स्ट्राँगरूमची पाहणी करून सुरक्षाव्यवस्थेची खातरजमा करणार आहेत. तसेच अमरावती तहसील कार्यालय आणि भातकुली तहसील कार्यालय येथे होणाऱ्या मतदानासाठीही विशेष बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे. १८ जून रोजी सकाळी सहा ते सायंकाळी चार वाजेपर्यंत मतदान केंद्रांच्या १०० मीटर परिसरात कडेकोट पोलिस बंदोबस्त राहणार आहे. यासाठी दोन पोलिस निरीक्षक, चार पोलिस उपनिरीक्षक आणि २० पोलिस कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

### मतमोजणीलाही सुरक्षाव्यवस्था चोख

२२ जून रोजी नियोजन भवन येथे होणारी मतमोजणीही अभूतपूर्व सुरक्षाव्यवस्थेत पार पडणार आहे. पोलिस उपायुक्त (परिमंडळ-एक) हे संपूर्ण बंदोबस्ताचे देखरेख अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळतील. त्यांच्या नेतृत्वाखाली एक सहायक पोलिस आयुक्त, चार पोलिस निरीक्षक, सहा पोलिस उपनिरीक्षक, ४० पुरुष पोलिस कर्मचारी आणि १५ महिला पोलिस कर्मचारी तैनात राहणार आहेत. याशिवाय संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी श्वान पथकाचाही समावेश करण्यात आला असून त्यात एक पोलिस निरीक्षक, दोन पोलिस उपनिरीक्षक आणि १० कर्मचारी कार्यरत राहतील.

# वंचितला पाठिंब्यावर काँग्रेसचा निर्णय अद्याप प्रलंबित

## तटस्थ भूमिकेची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याबाबत काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या चर्चेला अद्याप अंतिम स्वरूप आलेले नाही. या संदर्भात अमरावती येथे काँग्रेसच्या महत्त्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, बैठकीनंतरही कोणताही ठोस निर्णय जाहीर करण्यात आलेला नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे.या बैठकीसाठी अमरावती जिल्ह्यातील विविध नगरपरिषद आणि नगरपंचायतींमधील काँग्रेसचे गटनेते उपस्थित होते. आगामी निवडणुकीत पक्षाची भूमिका काय असावी, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. वंचित बहुजन आघाडीला पाठिंबा द्यावा की स्वतंत्र भूमिका घ्यावी, यावर विविध मतप्रवाह समोर आल्याचे समजते.सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेसकडून वंचितच्या उमेदवाराशी संपर्क साधण्याचे प्रयत्न करण्यात आले. मात्र, अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नसल्यामुळे निर्णय प्रक्रियेला विलंब होत आहे. त्यामुळे सध्या तरी वंचितला पाठिंबा देण्याचा प्रश्न अनिर्णितच राहिला आहे.दरम्यान, काँग्रेस या निवडणुकीत तटस्थ राहण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. पक्ष नेतृत्वाकडून सर्व बाजूंचा विचार करून अंतिम निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे.यासंदर्भात आज सायंकाळी ७ वाजता काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची गटनेत्यांसोबत आणखी एक बैठक होणार आहे. या बैठकीत पक्षाची अधिकृत भूमिका निश्चित होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, राजकीय वर्तुळाचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.



### अमरावतीत काँग्रेसमध्ये मतफुटीची भीती; भाजपला लॉटरी लागणार?

याच संपूर्ण राजकीय गोंधळाच्या पार्श्वभूमीवर, अमरावतीतील काँग्रेस नगरसेवकांमध्ये मोठ्या प्रमाणावर मतफूट होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. पक्षाचा प्रचार थंड असल्याने आणि नेत्यांमध्ये समन्वय नसल्याने काँग्रेसची मते फुटून त्याचा थेट आणि मोठा फायदा भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला होऊ शकतो, अशी जोरदार चर्चा रंगू लागली आहे.-

# देशात आणि राज्यातही काँग्रेसची तब्येत बिघडलेली

## आमदार बच्चू कडूंची खोचक टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक चांगलीच गाजू लागली आहे. निवडणुकीच्या या रणधुमाळीत शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. काँग्रेसच्या सध्याच्या ढासळत्या स्थितीवर थेट बोट ठेवत बच्चू कडू म्हणाले, महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशात काँग्रेसची राजकीय तब्येत बिघडलेली दिसते आहे. राज्यामध्ये अनेक जागा बिनविरोध झाल्या, पण एवढा मोठा पक्ष असूनही काँग्रेसला प्रभावी उमेदवार उभा करता आला नाही. साधा उमेदवारही मिळत नाही, आणि उभा केलेल्या उमेदवारालाही रुग्णालयात दाखल व्हावे लागते; यापेक्षा दुर्दैवी बाब कोणती? अशा शब्दांत त्यांनी काँग्रेसला टोला लगावला आहे.

### अधिवेशात प्रश्न सुटला नाही, तर

बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीविषयी देखील भाष्य केले आहे. बच्चू कडू म्हणाले, सरकारने कर्जमाफीच्या अटी-शर्तींविषयी पुनर्विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आम्ही मुद्दे मांडणार आहोत. जेवढ्या अटी-शर्ती कमी करता येतील,



याचा प्रयत्न आम्ही अधिवेशनात करू, आता मी आमदार असल्याने पहिला प्रयत्न हा अधिवेशनातच करावा लागेल. तरीही प्रश्न सुटला नाही, तर पुन्हा आंदोलन करण्याची आमची तयारी आहे, असे बच्चू कडू म्हणाले.

### काँग्रेसचे उमेदवार प्रचारातून गायब

निवडणूक जाहीर झाल्यापासून काँग्रेस या मतदारसंघात पूर्णपणे अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. काँग्रेसचे अधिकृत उमेदवार हर्षजीत देशमुख हे गेल्या अनेक दिवसांपासून रुग्णालयात दाखल होते. त्यांनी अद्याप निवडणुकीत कोणतीही सक्रिय भूमिका घेतलेली नसल्याची टीका काँग्रेसच्या नेत्यांनीच केली आहे. काँग्रेसने प्रचारासाठी साधी बैठकही घेतलेली नाही, काँग्रेसचा प्रदेश पातळीवरील एकही मोठा नेता अद्याप प्रचारात उतरलेला नाही. उमेदवार स्वतः आजारी असल्याने घरीच राहून केवळ 'डिजिटल प्रचारा'चा दावा करत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर बच्चू कडू यांनी काँग्रेसवर शाब्दिक हल्ला चढवला आहे.

# गुन्हेगारी माहिती जाहीर न केल्याने निलेश विश्वकर्मांना निवडणूक विभागाची नोटीस

## सर्वोच्च न्यायालयाच्या अवमानाची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती विधान परिषद निवडणुकीतीलवंचित बहुजन आघाडीचे उमेदवार निलेश विश्वकर्मा यांनी स्वत:विरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहिती निवडणूक नियमांनुसार प्रसिद्ध न केल्यामुळे निवडणूक विभागाने त्यांना नोटीस बजावली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार उमेदवारांनी आपल्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती वृत्तपत्रे व इतर माध्यमांतून जाहीर करणे बंधनकारक आहे. मात्र, संबंधित माहिती प्रसिद्ध न केल्याचे निदर्शनास आल्याने ही कारवाई करण्यात आली.मतदारांना उमेदवारांविषयी संपूर्ण माहिती मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार असून, गुन्हेगारी पार्श्वभूमी लपविणे म्हणजे मतदारांपासून महत्त्वाची माहिती दडविण्याचा प्रकार असल्याचे निवडणूक विभागाचे मत आहे.



यामुळे लोकशाही प्रक्रियेतील पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होते.उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी सांगितले की, निलेश विश्वकर्मा यांना पुन्हा स्मरणपत्रासह नोटीस बजावण्यात येणार आहे. त्यानंतरही आवश्यक माहिती प्रसिद्ध न केल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा तसेच निवडणूक आयोगाच्या कायदेशीर तरतुदींचा अवमान झाल्याची नोंद घेऊन पुढील योग्य निर्णय घेतला जाईल. या प्रकरणाकडे आता राजकीय वर्तुळासह मतदारांचेही लक्ष लागले आहे.-

# वारंवार अवैध दारू विक्रेत्यांवर आता लाखाचा दंड; न भरल्यास मालमत्तेवर बोजा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६अमरावती**

अवैध दारू विक्री करून वारंवार कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. दोनपेक्षा अधिक वेळा गुन्हे दाखल झालेल्या अवैध दारू विक्रेत्यांना आता एक लाख रुपयांपर्यंत दंड ठोठावला जाणार असून, दंड न भरल्यास संबंधितांच्या मालमत्तेवर बोजा टाकून रक्कम वसूल करण्यात येणार आहे.जिल्ह्यात अवैध दारू विक्री रोखण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाकडून सातत्याने धडक कारवाया केल्या जात असल्या तरी अनेक विक्रेते पुन्हा त्याच व्यवसायात सक्रिय होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा सराईत विक्रेत्यांवर अंकुश ठेवण्यासाठी दंडात्मक




कारवाईचा नवा मार्ग अवलंबण्यात येत आहे.याअंतर्गत दोनपेक्षा अधिक गुन्हे दाखल असलेल्या व्यक्तींना भविष्यात अवैध दारू विक्री न करण्याबाबत बंधपत्र (बाँड) लिहून द्यावे लागणार आहे. या बंधपत्रात एक लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात येणार असून, पुन्हा गुन्हा आढळल्यास शासनाकडून ही रक्कम वसूल केली जाईल.दरम्यान, अवैध दारू विक्री रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी ९ जून रोजी झालेल्या आढावा बैठकीत विशेष समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ च्या कलम ९३ अंतर्गत सराईत गुन्हेगारांविरुद्धचे प्रस्ताव तातडीने निकाली काढण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. पोलीस विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने समन्वयाने अधिक प्रभावी कारवाया राबवाव्यात, असेही निर्देश देण्यात आले आहेत.राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक एस. व्ही. गर्जे यांनी सांगितले की, वारंवार अवैध दारू विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, दंडाची रक्कम न भरल्यास मालमत्तेवर बोजा टाकून ती वसूल केली जाईल. त्यामुळे अवैध दारू व्यवसायाला आळा बसण्यास मदत होईल, असा विश्वास विभागाने व्यक्त केला आहे.

# नवीन शैक्षणिक सत्र सुरू, पण १३ लाख राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना अजूनही पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती:-** महाराष्ट्रातील



शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या असल्या तरी सुमारे १३ लाख राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात पाठ्यपुस्तकांशिवाय करावी लागत आहे.इयत्ता ३री, ४थी आणि ६वीचे विद्यार्थी सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ) २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेली अनेक नवीन पुस्तके अद्याप शाळा आणि पुस्तक विक्रेत्यांकडे पोहोचलेली नाहीत.शिक्षक आणि पालकांच्या म्हणण्यानुसार, राज्यातील अनेक भागांत इयत्ता ३री आणि ४थीच्या इंग्रजी व गणिताची पुस्तके उपलब्ध नाहीत, तर इयत्ता ६वीची हिंदी वगळता बहुतेक पुस्तके अद्याप वितरित झालेली नाहीत.सोमवार १५जून पासुन शाळा सुरू झाल्या असताना अनेक विद्यार्थी नेहमीप्रमाणे नवीन पुस्तकांसह नव्हे तर पुस्तकांशिवायच शाळेत आले आहेत. राज्याच्या विद्यार्थी नोंदणी पोर्टलनुसार या वर्गांमध्ये शिकणारे सुमारे १३ लाख विद्यार्थी या परिस्थितीमुळे प्रभावित झाले आहेत.सरकारच्या मोफत पाठ्यपुस्तक वितरण कार्यक्रमालाही या विलंबाचा फटका बसला आहे. उपलब्ध माहितीनुसार प्रत्येक जिल्ह्यातील सुमारे १५% विद्यार्थ्यांना अजूनही सरकारी व अनुदानित शाळांसाठीची पुस्तके मिळालेली नाहीत.इयत्ता ६वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोठे आव्हान यंदा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून इयत्ता ६वीसाठी पूर्णपणे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमानुसार शिकणारी ही पहिलीच विद्यार्थ्यांची तुकडी असल्याने परिस्थिती अधिक आव्हानात्मक बनली आहे.पाठ्यपुस्तके उपलब्ध होईपर्यंत अध्यापन कसे करायचे याबाबत शिक्षकांमध्येही संभ्रम आहे. हा तुटवडा भरून काढण्यासाठी शाळांना सेतू पुस्तिका वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या पुस्तिका राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (डउएठढ) यांनी तयार केल्या असून विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाशी जुळवून घेण्यास मदत करण्यासाठी तयार करण्यात आल्या आहेत.-

# धामणगावातील निर्मल उज्वल बँकेच्या भोंगळ कारभाराविरोधात ठेवीदार आक्रमक बँकेतच ठिय्या आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ धामणगाव रेल्वे**

धामणगाव येथील निर्मल उज्वल बँकेच्या कारभाराविरोधात ठेवीदारांनी तीव्र नाराजी व्यक्त करत बँकेतच ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. आपल्या हक्काचे ठेव पैसे वेळेवर मिळत नसल्याने संतप्त ग्राहकांनी बँक प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली.जोपर्यंत आम्हाला आमच्या ठेवींबाबत ठोस आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत आम्ही बँकेतून उठणार नाही, असा इशारा आंदोलक ठेवीदारांनी दिला. अनेक दिवसांपासून पैसे काढण्यासाठी फेऱ्या मारूनही समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने ग्राहकांचा संयम अखेर तुटला आहे.ठेवीदारांचे म्हणणे आहे की, त्यांनी आयुष्यभराची बचत या बँकेत ठेवली असून गरजेच्या वेळी स्वत:चे पैसे मिळत नसल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे बँक प्रशासनाने तात्काळ याकडे लक्ष देऊन ठेवीदारांच्या समस्यांचे निराकरण करावे, अशी मागणी करण्यात आली.-

# विधान परिषद निवडणुकीमुळे जिल्ह्यात आजपासून चार दिवस 'ड्राय डे'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती** विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, अमरावती जिल्ह्यात चार दिवसांसाठी 'ड्राय डे' घोषित करण्यात आला आहे. हा हा आदेश मंगळवार, १६ जून रोजी दुपारी ४ वाजल्यापासून लागू होईल. जिल्हाधिकारी आशिषयेरेकर यांनी यासंदर्भात एक आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, जिल्ह्यातील सर्व देशी आणि विदेशी दारू परवानाधारक, बार, बिअर शॉप आणि परमिट रूम निर्धारित कालावधीत बंद राहतील. प्रशासनाने सांगितले की, भारतीय आयोगाच्या निवडणूक निर्देशानुसार, स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघाच्या रिक्त जागेसाठी १८ जून रोजी मतदान होईल आणि २२ जून रोजी मतमोजणी होईल.शांततापूर्ण, निष्पक्ष आणि कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणारी निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार, १६ जून रोजी दुपारी ४ वाजल्यापासून ही बंदी लागू होईल. १७ जून रोजी दिवसभर दारू विक्रीवर बंदी असेल. १८ जून रोजी सुरू राहील.२२ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत




दारूबंदी लागू राहील. हा आदेश जिल्ह्यातील सर्व दारू विक्रेत्यांना लागू आहे, ज्यामध्ये एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल-४, एफएल-४ए, बिअर शॉप्स, सीएल-१, सीएल-३, बार आणि परमिट रूम्स यांचा समावेश आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व परवानाधारकांनाया आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन केले आहे. तसेच, नियमांनुसार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

